N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पिंपरी-चिंचवड **P.S.(ठाणे):** सांगवी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0496 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**04/09/2026 11:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 02/09/2026
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/09/2026
**Time From (वेळेपासून):** 10:53 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 04/09/2026 **Time (वेळ):** 10:57 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 008
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/09/2026 10:57 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** श्री कपा सोसायटी,आनंदनगर, स्वीमिंग टॅंक रोड, सांगवी येथे प्रशांत विश्वनाथ,विभुते यांचे राहते घराबाहेर
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्रीमती शैलजा शशिकांत शिंदे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ठी ए 102, विंडसर पार्क,माऊली चौक, दत्तमंदीर रोड,वाकड, पुणे 411057,सांगवी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ठी ए 102, विंडसर पार्क,माऊली चौक, दत्तमंदीर रोड,वाकड, पुणे 411057,सांगवी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7722011255

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. उमेश सुब्राव कुटे | | | 1. फ्लट न 1109, बी विंग, ,गट न 920,924,925,926,, नेवाळे वस्ती, शुभकलस सोसायटी,चिखली,सांगवी, पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी जबाब दि. 04/09/2026.

मी श्रीमती शैलजा शशिकांत शिंदे, वय- 40 वर्षे, व्यवसाय -नोकरी , पोलीस निरीक्षक, नेमणूक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे रा.टी. ए 102, विंडसर पार्क, माऊली चौक, दत्तमंदीर रोड, वाकड, पुणे 411057 मो. 7722011255.

आज रोजी समक्ष हजर राहून फिर्याद देते की, आम्ही दि. 02/09/2026 रोजी 16:30 वा. आमचे ला.प्र. वि. पुणे कार्यालय येथे हजर असताना श्री सतीश वाळके, पोलीस उप अधीक्षक, प्रशासन, पुणे यांनी आम्हाला त्यांचे कक्षात बोलावून सदर ठिकाणी हजर असलेले तक्रारदार श्री. सुरेश विश्वनाथ शेलार, रा ठि रुम न 6, साईसुख अपार्टमेंट, तन्नु शाळेजवळ, चैत्रबन नगर, नवी सांगवी, पुणे यांचे सोबत ओळख करुन देऊन त्यांची लाचेची तक्रार असुन आपण पुढील कारवाई करावी अशी सूचना केली. तसेच सदर कारवाईकामी पोकॉ/9843 महामुलकर, पो.शि. 9175/कुमकर व चालक सहायक फौजदार अविनाश चव्हाण यांचे ताब्यातील शासकिय वाहन इरटिगा गाडी क्र. MH 12 UC 4109 असे मदतीकरीता घेण्यास सांगीतले. तसेच सदर कारवाईसाठी थोडया वेळात पुणे महानगरपालिकेचे दोन पंच उपलब्ध करुन देतो असे कळविले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना आमचे कक्षामध्ये घेवुन गेलो. तेथे त्यांना त्यांचे पुर्ण नांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सुरेश विश्वनाथ शेलार, वय- 59 वर्षे, काम- टेलर वर्ग 4, पोलीस अधीक्षक, लोहमार्ग मुख्यालय, खडकी, पुणे रा ठि रुम न 6 साईसुख अपार्टमेंट, तन्नु शाळेजवळ, चैत्रबन नगर, नवी सांगवी, पुणे असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांचेशी आम्ही त्यांचे तक्रारीबाबत चर्चा केली असता तक्रारदार यांनी कर संकलन विभाग, सांगवी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे येथील लिपिक उमेश मंगल सुब्राव कुटे यांचेविरुद्ध लाचेची तक्रार असल्याचे सांगीतले व त्यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली, ती पुढीलप्रमाणे-

"“मी वर नमुद अर्जदार सुरेश विश्वनाथ शेलार, वय- 59 वर्षे, काम- टेलर वर्ग 4, पोलीस अधीक्षक, लोहमार्ग मुख्यालय, खडकी, पुणे रा ठि रुम न 6 साईसुख अपार्टमेंट, तन्नु शाळेजवळ, चैत्रबन नगर, नवी सांगवी, पुणे मो बा 9923157695 या ठिकाणी सन 2019 पासुन माझे कुटुंबियांसह राहणेस आहे. मी पोलीस अधीक्षक, लोहमार्ग मुख्यालय, खडकी, पुणे येथे टेलर या पदावर नोकरीस आहे. माझे मुळ गाव मु.पो. लिंबगाव गांगर्डा, ता कर्जत, जि अहमदनगर असे आहे.

मी सन 2012 मध्ये सर्वे क्र 10/2, मोरया पार्क, लेन न 6, पिंपळे गुरव, पिंपरी चिंचवड, पुणे येथे 1 गुंठा जागा खरेदी केली. सदर जागेवर मी सुसंग या नावाने 3 मजली इमारत बांधली आहे. सदर इमारतीवर नवीन कर आकारणी सुरु करणेसाठी दिनांक 02/08/2026 रोजी मी पिंपरी चिंचवड महानगरपालिका, सांगवी, पुणे येथे करआकारणी व करसंकलन विभाग येथे गेलो असता, तिथे उमेश मंगल सुब्राव कुटे, लिपिक यांचेकडे चौकशी केली. त्यावेळी त्यांनी मला नवीन मिळकतीची कर आकारणी करणेबाबत एक फॉर्म दिला व तो भरुन त्यांचेसोबत कागदपत्रे देण्यास सांगितले. सदर फॉर्म व कागदपत्रे ही दिनांक 06/08/2026 रोजी मी सदर कार्यालयात जमा करुन आलो. त्यानंतर दिनांक 26/08/2026 रोजी लिपीक उमेश कुटे यांनी आमच्या सर्वे क्र 10/2 येथील सुसंग या इमारतीची



Scanned with CamScanner

पाहणी करुन मोजमाप घेतले. त्यानंतर दिनांक 31/08/2026 रोजी लिपीक उमेश कुटे यांनी त्यांचे मोबाईल क्र 8788739578 यावरुन मला कॉल केला असता सदर कॉल मी गाडीवर असल्याने उचलता आला नाही. त्यानंतर दुपारी साधारण 12:00 वाजता मी त्यांना कॉल केला असता त्यांनी मला माझे वर नमुद इमारतीची लाईटबिलची प्रत आणुन देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी दिनांक 01/09/2026 रोजी सकाळी 11:30 वाजता मी त्यांना कॉल करुन ते ऑफीसमध्ये असल्याची खात्री करुन त्यांना सदर इमारतीचे लाईटबिल देवुन आलो. त्यानंतर आज दिनांक 02/09/2026 रोजी 10:43 वाजताचे सुमारास त्यांनी मला कॉल केला व ऑफीसमध्ये बोलविले. मी तिथे सकाळी 11:15 वाजताचे सुमारास पोहचलो तेथे मला लिपिक उमेश कुटे हे भेटले. त्यावेळी त्यांनी मला माझे इमारतीचे करआकारणी कागदपत्रे दाखविली. त्यांनी मला सदर इमारतीवर प्रतिवर्ष 91472/- रुपये इतका टॅक्स भरावा लागेल असे सांगितले. नियमाप्रमाणे एवढा जास्त टॅक्स बसु शकत नाही, याची मला खात्री होती. म्हणुन मी त्यांना टॅक्स हा जास्त असुन सदर टॅक्स हा कमी होवु शकतो का, याबाबत विचारणा केली असता, त्यांनी “"मी जो टॅक्स लावेन तोच फायनल आहे, असे सांगितले.” त्यानंतर मी त्यांना टॅक्स कमी करण्याबाबत विनंती केली असता लिपिक कुटे हे मला म्हणाले की, “"मी प्रतिवर्षाकरीता 50000/- रुपयांच्या आत तुमचा टॅक्स बसवु शकतो, त्याकरता तुम्हाला 1,50,000/- रुपये दयावे लागतील” असे सांगितले. त्यानंतर मी त्यांना सदर रक्कम जास्त असल्याचे सांगितले असता उमेश कुटे यांनी मला 1,20,000/- ही अंतिम रक्कम दयावी लागेल, असे सांगितले. माझे इमारतीवरील नवीन कर आकारणी ही जास्त असल्याचे दाखवुन ती कमी करण्यासाठी उमेश मंगल सुब्राव कुटे यांनी मला 1,20,000/- रुपये लाच मागितल्याची माझी खात्री झाली. माझी सदर लाच रक्कम देण्याची इच्छा नाही. तसेच माझे व लिपीक श्री उमेश कुटे यांचेत कोणतेही पुर्ववैमनस्य तसेच आर्थिक देवाण घेवाण किंवा उसणवारी नाही. तरी उमेश मंगल सुब्राव कुटे, लिपिक, करआकारणी व करसंकलन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड, पुणे यांचेविरुद्ध कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे” वगैरे मजकुराची तक्रार लिहुन दिली.

त्यानंतर 19:00 वाजताचे सुमारास दोन पंच आमचे कक्षात हजर झाले त्यांची नावे पंच श्री निरंजन विलास खेडकर, वय 33 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद - कनिष्ठ लिपिक, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, इमारती विभाग, पुणे, रा. फलॅट नं.107,एम विंग, पकंज आस्मान, संतनगर, लोहगाव, पुणे 47 मो बा 8975362436 व पंच तुषार संजय गोगावले, वय 26 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- कनिष्ठ लिपीक, उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे, रा. मु पो कोरेगाव बु. ता ख्रेड, जि पुणे 410505 मो क्र 7038592208 अशी असुन सदर तक्रारीचे अनुषंगाने कारवाईकामी त्यांची नेमणुक केल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर तक्रारदार व पंचाची एकमेकांना ओळख करुन दिली व ओळख करुन घेतली. तक्रारदार यांनी पंचांना प्रथम तोंडी तक्रार कथन केली. त्यानंतर त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन दिलेली तक्रार दाखविली असता दोन्ही तक्रार एकच असल्याची खात्री करुन सदर लेखी तक्रारीवर पंचांनी व आम्ही समक्ष म्हणुन सही केली. सदर तक्रार लिहीत असताना लोकसेवक कुटे यांचे फोन ठेवून गेल्याने त्याअनुषंगाने लोकसेवक श्री उमेश कुटे यांची तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 02/09/2026 रोजी फोनद्वारे पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्याप्रमाणे तक्रारदार लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, पुणे येथुन तक्रारदार यांचे मोबाईल क्र 9923157695 यावरुन लोकसेवक उमेश सुब्रव कुटे यांचे मो क्र 8788739578 यावर 19:43 वाजता फोन केला असता आलोसे उमेश कुटे यांनी तक्रारदार शेलार यांना दिनांक 03/09/2026 रोजी करसंकलन कार्यालय, सांगवी, पिंपरीचिंचवड,पुणे येथे बोलविल्याचे निष्पण्ण झाले.

त्याप्रमाणे दिनांक 03/09/2026 रोजी आम्ही तक्रारदार शेलार यांना पी डब्ल्यु मैदान, येथे सकाळी 9:45 वाजता जाऊन थांबण्याबाबत सुचना केली. त्यानंतर आम्ही सापळा पथक व पंचासह पडताळणी/सापळा कारवाईसाठी आवश्यक असणारे प्रिंटर, लॅपटॉप, अँथ्रसीन पावडर, काळा कपडा, स्टेशनरी साहित्य, अल्ट्रा व्हायोलेट दिवा, सिलींग लेबलींगचे साहित्य इ. साहित्य शासकीय वाहन इरटिगा गाडी क्र. MH 12 UC 4109 मध्ये ठेवुन लाप्रवि कार्यालय येथुन 09:15 वा. रवाना झालो. त्यानंतर वाकडेवाडी, दापोडी मेट्रोस्टेशनच्या पुढील चौकातून डावीकडे, एस टी वर्कशॉप, जुने सांगवी बस स्टॉप- सांगवी पोलीस स्टेशन समोरील पी डब्ल्यू डी मैदान येथे 10.05 वा. पोहचलो. सदर ठिकाणी तक्रारदार शेलार हे त्यांचेकडील काळ्या रंगाच्या युनिकॉर्न गाडी क्र. एम एच 14 के एच 8008 सह हजर होते. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना आमचे शासकीय वाहनात घेवुन तक्रारदार व पंचांना लाच मागणी पडताळणी कारवाईसाठी आमचे कडील व्हाईस रेकॉर्डर, व्हिडीओ कॅमेरा तसेच शासकीय शर्टातील स्पाय व्हिडीओ कॅमेरा दाखवुन सदर व्हाईस रेकॉर्ड मध्ये 32 जीबी क्षमतेचे ईव्हीएम कंपनीचे नवीन मेमरी कार्ड टाकले व व्हिडीओ कॅमेऱ्यामध्ये 32 जीबी क्षमतेचे ई व्ही एम कंपनीचे दुसरे नवीन मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर शासकीय शर्टातील स्पाय व्हिडीओ कॅमेऱ्यामध्ये 32 जी बी क्षमतेचे एच आय के कंपनीचे तिसरे मेमरीकार्ड घातले.



Scanned with CamScanner

नमुद तिन्ही कार्डचे वर्णन पंचनाम्यामध्ये नमुद करण्यात आले आहे. त्यानंतर 10:30 वाजता व्हाईस रेकॉर्डर व व्हिडीओ कॅमेरा सुरु करुन तक्रारदार श्री. सुरेश शेलार, पंच क्र.1 श्री. निरंजन खेडकर, पंच क्र. 2 श्री तुषार गोगावले यांची निवेदने ध्वनिमुद्रीत केली. त्यानंतर व्हिडीओ कॅमेरा व शासकीय व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. ती वेळ 10:33 वाजताची होती. यानंतर 10:39 वाजता तक्रारदार शेलार यांचे मोबाईलवर आलोसे कुटे यांचा फोन आला. त्यावेळी सदर कॉल हा रेकॉर्डवर घेण्यात आला. त्यावेळी आलोसे कुटे यांनी तक्रारदार शेलार यांना कार्यालयात येण्यास सांगितले व सोबत तक्रारदार यांचे मुलाला घेवून येण्यास सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच 1 व 2 तसेच सापळा पथक यांना पडताळणी कारवाईविषयी आवश्यक सुचना दिल्या. व पंच क्र 1 खेडकर यांना तक्रारदार यांचा मुलगा म्हणुन सोबत जाण्याची सुचना दिली. त्यानंतर तक्रारदार श्री शेलार यांना व्हाईस रेकॉर्डर लावले व स्पाय कॅमेरा बसवलेला शासकीय शर्ट घालण्यास दिला. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर व स्पाय कॅमेरा चालु करुन पडताळणीसाठी तक्रारदार यांचे युनिकॉर्न दुचाकी गाडी क्र. MH 14KH 8008 यावरुन तक्रारदार यांचेसोबत पंच क्र.1 श्री. खेडकर यांना रवाना केले. ती वेळ 10:53 वा.ची होती. आम्ही उर्वरित सापळा पथक व पंच क्र.2 यांचेसह पी डब्ल्यु डी मैदानावर थांबुन राहिलो. 11:31 वाजता तक्रारदार व पंच क्र 1 हे आम्ही थांबलो होतो त्या ठिकाणी परत आले. त्यावेळी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला. त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 श्री. निरंजन खेडकर यांना गेल्यापासून येईपर्यंत काय झाले असे विचारले असता, त्यांनी सांगीतले की, "¨मी व तक्रारदार असे त्यांचे दुचाकी वाहनावरुन करसंकलन कार्यालय सांगवी, पुणे येथे गेलो असता इमारतीच्या पहिल्या मजल्यावर कर संकलन ऑफीस मध्ये गेलो. तेथे लोकसेवक उमेश कुटे हे कार्यालय येथे हजर होते. त्यावेळी तक्रारदार व मी त्यांचे जवळ गेलो त्याना तक्रारदार यांनी नमस्कार केला, त्यावेळी लोकसेवक कुटे हे इतर व्यक्तीसोबत इतर कामाविषयी बोलत होते. थोडया वेळाने लोकसेवक कुटे हे तक्रारदार यांचेसोबत बोलले त्यावेळी ते तक्रारदार यांना त्यांचे घराचे लाईटबिलाचे कागदपत्राबाबत विचारणा करत होते. त्यानंतर लोकसेवक कुटे यांनी माझेबाबत विचारणा केली त्यावेळी लोकसेवक कुटे यांना मी तक्रारदार शेलार यांचा मुलगा विश्वजीत शेलार असल्याचे सांगितले. त्यानंतर लोकसेवक कुटे हे तक्रारदार शेलार व मला चहा बाबत विचारणा करुन ऑफीसच्या खाली मागील गेटने थोडया अंतरावर असणाऱ्या "चहा आणि ¨मी" या हॉटेलमध्ये घेवुन गेले. तेथे त्यांनी त्यांचे मोबाईलमधील कॅल्क्युलेटरवर घरकर आकारणीबाबत हिशोब करुन दरवर्षी एकुण 1,41,000/- कर बसत असून तो कमी करुन दरवर्षी 50000/- पर्यंत येईल असे करुन देतो, असे तक्रारदार व मला सांगुन त्याकरीता 1,20,000 असा आकडा मोबाईलमधील कॅल्क्युलेटरवर टाईप करुन दाखविली व तेवढी रक्कम दयावी लागेल, असे सांगितले. त्यानंतर सदर रक्कम ही दुपारी 1 ते 2 वाजेपर्यंत घेवुन येण्यास सांगितले. त्यानंतर मी व तक्रारदार शेलार त्यांचे दुचाकीवरुन परत पीडब्ल्युडी मैदानात आलो." अशी हकीकत पंच 1 खेडकर यांनी पंच क्र 2 गोगावले यांचेसमक्ष आम्हाला सांगितली. ****त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पंच क्र 2 यांचेसमक्ष झालेल्या पडताळणीबाबत विचारले असता त्यांनी सांगितलेकी, "मी व पंच खेडकर असे माझे दुचाकी वाहनावरुन करसंकलन कार्यालय सांगवी, पुणे येथे गेलो असता इमारतीच्या पहिल्या मजल्यावर कर संकलन ऑफीस मध्ये गेलो. तेथे लोकसेवक उमेश कुटे हे कार्यालय येथे हजर होते. त्यावेळी मी व पंच खेडकर त्यांचे जवळ गेलो मी त्यांना नमस्कार केला. त्यावेळी लोकसेवक कुटे हे इतर व्यक्तीसोबत इतर कामाविषयी बोलत होते. थोडया वेळाने लोकसेवक कुटे हे मला माझे नवीन घराचे लाईटबिलाचे कागदपत्राबाबत विचारणा करत होते. त्यानंतर लोकसेवक कुटे यांनी माझेसोबत असणारे पंच यांचेबाबत विचारणा केली त्यावेळी पंचांनी त्यांना माझा मुलगा विश्वजीत शेलार असल्याचे सांगितले. त्यानंतर लोकसेवक कुटे हे मला व पंचांना चहा बाबत विचारणा करुन ऑफीसच्या खाली मागील गेटने थोडया अंतरावर असणाऱ्या चहा आणि मी या हॉटेलमध्ये घेवुन गेले. तेथे लोकसेवक कुटे हे पंचांना उद्देशुन बोलतात, शेलार ...हा काल आम्ही त्याच रेडी केलंत नाय का ते ऑलरेडी, त्यांना दाखवलं सगळं.. त्यांनतर बोलता बोलता लोकसेवक कुटे हे .मला व पंचानां घराचे कर आकारणीचा हिशोब समजावुन सांगत होते. त्यावेळी लोकसेवक कुटे हे त्यांचे मोबाईलमधील कॅल्क्युलेटरवर घरकर आकारणीबाबत हिशोब करुन "परत पार्किंग 48 मिटर मग ते येईल किती पाचशे पर्यंत पार्किंग नाही का...मग ते व्यवस्थित मी देतो करुन...आता जिथं तुमचा 1 लाख 43 हजार वर्षाला टॅक्स यायचाय तो फक्त आता पन्नास हजारच्या आत असुन देतो, पन्नासच्या पण आत." असे मला व पंचांना बोलतात. त्यानंतर मी लोकसेवक कुटे यांना विचारले की, "आणि ते पण सांगा पन्नासच्या आत जर नसलं केलं तर किती येईल" त्यावेळी लोकसेवक कुटे म्हणतात, "सांगितलं की त्यांना.. एक बेचाळीस " त्यानंतर लोकसेवक कुटे पंच खेडकर यांना म्हणाले, "थांबा तुम्हाला मी दावतो..तुम्हाला मी यांना मी काल पण दाखवलं यांच्या समोर रेडी पण केलंलंय..हे बगा 272 हे झालं आपल" त्यानंतर लोकसेवक कुटे हिशोब दाखवताना बोलले की, झाले परियोगी गुणुले 87500 ओके...परत 48 हे काय...पार्किंग त्याचं 81 रुपये असतील, ते आलं 3888 रुपये.. प्लस ते 85...87 हजार 584 आलंतं, 91472 हे आलं वर्षाचं तुमच्या नाही का...त्याच्या वरती हा आला टॅक्स...



Scanned with CamScanner

57627 बरोबर.. हा शास्ती...84 प्लस 57....एक लाख 41 हजार" त्यानंतर पंच लोकसेवक कुटे यांना म्हणाले की, "कमी करता येईल" त्यावर लोकसेवक कुटे हे म्हणाले की, "¨मगं मी म्हंल..मी त्यांना आओ त्यांनी मला बोलले...हे बगा मला तुमचा जर फायदा होत असलं तर वाचवण्याचा प्रयत्नच करतोय ना आपण" त्यानंतर मी लोकसेवक कुटे यांना विचारले की, "¨मगं आता आपलं एकुण याच्यावरती किती किती कमी करणार...कमी किती करणार म्हजी आता." त्यावर लोकसेवक कुटे मला सांगतात की, "त्यासाठी तुम्हाला मी म्हंल मी पन्नासच्या आतमध्ये दरवर्षी..आतच अन...लाइफटाईम " त्यावर मी लोकसेवक कुटे यांना विचारले की, "त्यासाठी तुम्हाला किती किती द्यावे लागतील आता" त्यावेळी लोकसेवक कुटे हे पंच खेडकर यांना बोलतात, "आता वडलाच्या शब्दाखातर नाय का मी त्यांना बोल्लो होतो....असे बोलुन लोकसेवक कुटे यांनी त्यांचे मोबाईलचे कॅलक्युलेटर ओपन करुन त्यावर 120000 असे टाईप करुन दाखवले", पंच खेडकर याना म्हणाले, "हे बगा...उलट आमचं सुरवातीलाच बोलण झालतं ...ते मला म्हंले थोडं कमी करा...एवढं आपण त्यांना बोललो होतो.." असे बोलुन लोकसेवक कुटे हे पंच खेडकर यांना मोबाईल कॅल्क्युलेटरवर 150000 असे टाईप करुन दाखवतात. त्यावेळी पंच खेडकर हे हो सर असे म्हणतात. त्यानंतर मी लोकसेवक कुटे यांना माझे मोबाईलमधील बॅक अंकाऊंटचा बॅलन्स दाखवुन म्हणालो, "आता माझ्या माझ्या अकाउँटला 24,442 ये, मी कालपासुन जे पळतोय ना ते पैश्यासाठी पळतोय...पोराला ¨म्हलं" त्यावर लोकसेवक कुटे मला "हम्म" असे म्हणतात. त्यावर मी लोकसेवक कुटे यांना म्हणालो, "की कोण मिळणारे ते आता" त्यावर लोकसेवक कुटे मला म्हणाले की "नाही जे आहे ते समोरा- समोरये तुमच्या " त्यावर मी कुटे यांना म्हणालो की "नाही नाही... मान्यये ना ¨मला.." त्यावर लोकसेवक मला "हा" असे म्हणतात. त्यावर मी लोकसेवक कुटे यांना म्हणालो "तर पैसे फक्त आज दुपारी एक वाजेपर्यंत येणारेतं." त्यावर पंच खेडकर लोकसेवक कुटे यांना म्हणतात की, "अजुन काय कमी करता येईल का" त्यावर लोकसेवक कुटे पंच खेडकर यांना म्हणतात की, "त्या पन्नासच्या आतमधी सुद्धा थोडं कमी होईल." त्यावर पंच खेडकरला म्हणले की, "नाही नाही हे यांच्या" त्यावर लोकसेवक कुटे पंच खेडकर यांना म्हणाले की, "ऐका याच्यात आता राव...त्यांना माहिते.. कसंये माहितीयेका आपलं ऐकट्याचं नसंत...याच्यापुढं पाच टेबल, सगळ्यांना चारीत- चारीतचं जावं लागतंय...होय शेलार सर काही चुकीचये का..आता फक्त यांच्या शब्दाखातर नाही का" त्यावर मी त्यांना होकार देतो. त्यानंतर लोकसेवक कुटे मला म्हणाले की, "आपल्याला सगळ बसवायचेते तुम्ही दुपारी आलात की देतो मी सगळ तुमाला. मला ते देऊन टाका सगळं...मी लगेच तुम्हाला ते सह्याला देऊन टाकतो" त्यावर मी लोकसेवक कुटे यांना म्हणालो की, "अ वाजे पर्यंत येऊ ¨मग", त्यावर लोकसेवक कुटे मला म्हणाले की, "कधी पण या तुम्ही." त्यानंतर मी लोकसेवक कुटे यांना विचारले की, "बर मग किती आणु फायनल पेमंट त्यावर लोकसेवक कुटे मला म्हणाले की, "सगळच की तुम्हाला काल बोल्लो ते" त्यानंतर मी लोकसेवक कुटे यांना म्हणालो की, "कितीये सांगा की एक बार थोडस" त्यावर लोकसेवक कुटे मला म्हणाले की, "तुम्ही राव आता" त्यावर मी लोकसेवक कुटे यांना म्हणालो की, "किती ओ काही नाही आपला मुलगा आणला काय फ्रंकली बोलायचं आता किती..." त्यावर लोकसेवक कुटे यांनी पंच खेडकर यांचे समक्ष मला त्यांचे मोबाईलचे कॅलक्युलेटर ओपन करुन त्यावर 1,20,000 असे टाईप करुन दाखवले. त्यावर मी लोकसेवक कुटे यांना म्हणालो की, तीस विस....काही तरी कमी करा की तुम्ही.....बगितलं ना बगितलं ना मी म्हंजे काल एवढं फिरलोय पैश्यासाठी.. शेवटी पोराला म्हंटल बाबा कोण देणारे का तर मुलगा म्हंला आपल्याला आज दोन वाजेपर्यंत मिळतील त्याच्या आतमध्ये मिळाले ना काय ." त्यावर लोकसेवक कुटे पंचाना जॉबला कुठे असा प्रश्न विचारतात, त्यावर पंच खेडकर सिटी प्राईड असे उत्तर देतात. त्यानंतर मी लोकसेवक कुटे यांना म्हणालो की, " काय तरी करा राव कमी आपल " त्यावर लोकसेवक कुटे मला म्हणाले की, तीस कमी केले ना... तीस कमी केलेत ऑलरेडी आपण...पण कसं आपल्या हातात काहीच नाई रात... आता ए◌ॅका आणखी सगळ्यात महत्वाचं आणखी काय आयडीया केली माहितीये का एवढं करुन पण त्याच्यत जात होतं....तर एक एक मिटर मी कमी लावला...म्हंजी हया स्टेजला जाऊन पण बरं का आपल ." त्यानंतर मी लोकसेवक कुटे यांना ¨म्हणालो बर बर त्यानंतरही करआकारणी कशी कमी केली याबाबत वारंवार लोकसेवक कुटे मला सांगत होते व त्याअनुषंगाने स्टॅपपेपरबाबत माहिती देत होते. त्यानंतर लोकसेवक कुटे यांनी मला सदर लाच रक्कम घेवुन एक वाजेपर्यंत त्यांचे कार्यालयाबाहेर येण्यास सांगुन लोकसेवक निघुन गेले. यानंतर मी व पंच खेडकर असे माझे दुचाकीवरुन परत पीडब्ल्युडी मैदानात आलो

त्यानंतर आम्ही सदर व्हाईस रेकॉर्डर फास्ट फॉरवर्ड करुन ऐकले असता सदर संभाषण हे तक्रारदार व पंच यांनी सांगितलेल्या हकीकतप्रमाणे असल्याचे दिसुन आले. एकंदरीत झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार शेलार व लोकसेवक श्री उमेश कुटे यांची समक्ष भेट होऊन त्यांचेमध्ये घरकर आकारणी कमी करण्यासाठी चर्चा झाली. त्यावेळी तक्रारदार यांना लोकसेवक उमेश कुटे यांनी त्यांचे नवीन घराची कर आकारणी जास्त असल्याचे



Scanned with CamScanner

दाखवुन कमी करण्यासाठी एक लाख वीस हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच नमुद लाच रक्कम ही दुपारी एक वाजता देण्याबाबत सांगितले आहे.

त्यानंतर तक्रारदार श्री शेलार व पंचांना सापळापुर्व तयारी करत असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर आम्ही सापळा पथकातील चालक पो शि चव्हाण यांचे मदतीने शासकिय वाहनामध्ये तक्रारदार शेलार व दोन्ही पंच यांना अँन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिक करून दाखवुन सापळा कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना तक्रारदार पंच क्र 1 व 2 तसेच सापळा पथकास दिल्या. याबाबत सविस्तर पंचनाम्यामध्ये नमुद करण्यात आले आहे. त्यानंतर आम्ही लाच रक्कम देणेकामी तक्रारदार शेलार यांना विचारणा केली असता त्यांनी त्यांचे बचतीमधुन 45,000/- रुपये सादर केले. उर्वरित 75000/- रुपये हे आम्ही सोबत आणलेल्या खेळण्यातील डमी नोटा वापरण्याचे ठरविण्यात आले. आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी हजर केलेल्या भारतीय चलनातील 500 रु. दराच्या 90 नोटांचे नंबर पोशि महामुलकर यांनी पो शि कुमकर यांचे मदतीने एका कोऱ्या कागदावर लिहुन घेतले. त्याचे सविस्तर वर्णन पंचनाम्यामध्ये नमुद आहे. लाच रक्कम रुपये 45,000/- (रूपये 500/- दराच्या 90 भारतीय चलनी नोटा) व उर्वरित 75000/- रुपयांच्या 500 रुपये दराच्या 150 खेळण्यातील डमी नोटा यांना सहायक पोलीस फौजदार चालक चव्हाण यांनी अँन्थ्रासीन पावडर लावली. त्यातील प्रत्येक गठ्ठयामध्ये 500 रुपये दराच्या 45 नोटा व 150 डमी नोटा एकत्रित करुन त्यांचे दोन गठ्ठे बनविण्यात आले. सहायक पोलीस फौजदार चव्हाण यांनी सदर लाचेची रक्कम तक्रारदार चव्हाण यांनी घातलेल्या राखाडी रंगाच्या पँटच्या पुढील उजव्या खिशात ठेवली व आमचेसुचनेवरुन सहायक पोलीस फौजदार चव्हाण यांनी स्वच्छ पाण्याने हात धुतले. त्यानंतर सापळापुर्व निवेदन घेण्याकरीता सापळा पथकाचे मदतीने व्हाईस रेकॉर्डर व व्हिडीओ रेकॉर्डर सुरू चालू केला. ती वेळ 13:21 वाजताची होती. त्यामध्ये प्रथम तक्रारदार सुरेश शेलार व पंच क्र.01 श्री. खेडकर व पंच क्र.02 श्री गोगावले यांचे निवेदन घेतले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर व व्हिडीओ रेकॉर्डर बंद केला. त्यावेळी 13:26 वाजले होते.

त्यानंतर सापळा कारवाईबाबत आवश्यक सुचना दिल्या. पो शि महामुलकर यांचे मदतीने तक्रारदार शेलार यांना व्हाईस रेकॉर्डर लावला तसेच तक्रारदार यांचे अंगावर असलेला स्पाय कॅमेरा असलेला शर्टमधील कॅमेरा पोलीस शिपाई कुमकर यांचे मदतीने पुन्हा चालु केला. तक्रारदार व पंच क्र 1 खेडकर यांना त्यांचे वर नमुद दुचाकीवरुन करसंकलन कार्यालय, सांगवी, पिंपरी चिंचवड, पुणे येथे पाठविण्यात आले. ती वेळ 13:29 वाजताची होती. त्यांचे पाठोपाठ आम्ही सापळा पथकासह शासकीय वाहनाने कोणसही संशय येणार नाही असे निघालो. त्यानंतर करसंकलन कार्यालयाचे परिसरामध्ये विखरुन थांबलो. काही वेळाने तक्रारदार शेलार हे लोकसेवक कुटे यांचे गाडीवर बसले तसेच पंच खेडकर हे तक्रारदार यांचे मोटरसायकलवर बसुन तिघेही कार्यालयाचे बाहेर गेल्याचे दिसले. त्याप्रमाणे उर्वरित सापळा पथकाने त्यंाचा पाठलाग केला. थोडया वेळात श्री कृपा सोसायटी, आनंदनगर, स्वीमिंग टँक रोड, सांगवी येथे प्रशांत विश्वनाथ विभुते यांचे राहते घराबाहेर तक्रारदार यांनी सापळा पथकाला त्याचे डोळ्यावरचा चष्मा काढुन लाच रक्कम स्वीकारलेचा पुर्वनियोजित इशारा केला, त्यावेळी आम्ही सापळा पथक व पंच क्र.2 गोगावले असे लोकसेवक कुटे व तक्रारदार थांबलेल्या ठिकाणी गेलो. त्यावेळी पोशि महामुलकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला. तसेच पो शि कुमकर यांचे मदतीने शर्टमध्ये असलेल्या स्पाय कॅमेऱ्यातील मेमरी कार्ड काढुन घेतले. ती वेळ 14:00 वाजताची होती. त्यानंतर आम्ही पंच खेडकर यांना लोकसेवक कुटे यांनी लाच रक्कम कुठे ठेवली याबाबत विचारले असता, पंच खेडकर यांनी सांगितले की, सदर लाच रक्कम ही लोकसेवक कुटे यांचे पाठीला अडकविलेल्या काळ्या रंगाच्या सॅगमधील दुसऱ्या कप्प्यात आहे. त्यानंतर आम्ही लोकसेवक कुटे यांना आमची ओळख सांगुन त्यांचेविरुद्ध झालेल्या सापळा कारवाईची माहिती दिली. तसेच लोकसेवक कुटे यांना त्यांचे नाव व पुर्ण पत्ता याबाबत विचारणा केली असता श्री कुटे यांनी त्यांचे नाव श्री. उमेश सुब्राव कुटे, वय 35 वर्षे, पद- लिपीक, वर्ग- 3, नेमणुक- कर संकलन विभाग सांगवी, पिंपरी- चिंचवड, रा- फ्लॅट न 1109, बी विंग, गट न 920,924,925,926,नेवाळे वस्ती, शुभकलस सोसायटी, चिखली असे सांगितले.

त्यावेळी आमचे सुचनेप्रमाणे पोशि कुमकर यांनी व्हिडीओ रेकॉर्डर सुरू करुन रस्त्यावर कृत्रीम अंधार केला तेव्हा आम्ही आमचे स्वत:चे व त्यानंतर सापळा पथकाचे व पंच 01 यांचे हाताची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये तपासणी केली असता कुठलीही चकाकी दिसुन आली नाही. त्यानंतर पंचांसमक्ष आम्ही लोकसेवक कुटे यांचे पाठीवरील बॅगेमध्ये ठेवलेल्या लाच रक्कमेची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये तपासणी केली असता लाचरक्कम व लाच रक्कम ठेवलेल्या सॅगच्या दुसऱ्या कप्प्याची तपासणी केली असता अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळया रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर आम्ही दिलेल्या सुचनेवरून पंच क्र.2 गोगावले यांनी लाच रक्कम ताब्यात घेवून सदर नोटांवरील नंबर व सापळापुर्व कारवाई दरम्यान नोटांचे नंबर लिहून दिलेला कागदावरील नंबरशी

Scanned with CamScanner

तपासून पाहिले असता तंतोतंत जुळून आले. पंच क्र.2 गोगावले यांचे दोन्ही हाताची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये तपासणी केली असता पंच क्र 2 श्री गोगावले यांचे तळहातांवर तसेच बोटांचे पेऱ्यावर अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळ्या रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर तक्रारदार श्री. शेलार यांची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता त्यांचे उजव्या हाताचे बोटांचे पेऱ्यांना व परिधान केलेल्या पँटच्या पुढील बाजुचे उजव्या खिशाचे कडांना व आतमध्ये अँन्थ्रासिन पावडरची फिक्कट निळ्या रंगाची चकाकी दिसून आली. सदर लाच रक्कम हस्तगत करतेवेळी वेळीच्या घटनेचे पोशि आश्विन कुमकर यांनी त्यांचेकडे दिलेल्या शासकीय व्हिडीओ कॅमेऱ्यामध्ये व्हिडीओ रेकॉर्डिंग केले आहे.
त्यानंतर आम्ही पंच क्र 1 खेडकर यांना सापळा कारवाईवेळी घडलेल्या हकिकतीबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, तक्रारदार शेलार व मी असे येथील करसंकलन कार्यालय, सांगवी येथे गेलो त्यावेळी कार्यालयामध्ये लोकसेवक उमेश कुटे हे कार्यालयामध्ये हजर नव्हते. त्यामुळे मी व तक्रारदार कार्यालयाबाहेर आलो, त्यावेळी तेथे लोकसेवक कुटे हे बाहेरुन आल्याचे दिसले. त्यानंतर लोकसेवक कुटे यांनी तक्रारदार यांना स्टॅप पेपर घ्यायचा आहे, असे सांगुन आम्हाला दोघांना त्यांचे एम एच 14 एम यु 5448 या युनिकॉर्न होंडा दुचाकी गाडीवर त्यांचे पाठीमागे बसण्यास सांगितले. परंतु तक्रारदार शेलार हे लोकसेवक कुटे याचे त्यांचे गाडीवर त्यांचे पाठीमागे बसले व मी तक्रारदार यांची दुचाकी घेवुन त्यांचे पाठीमागे निघालो. श्री कृपा सोसायटी, आनंदनगर, स्वीमिंग टँक रोड, सांगवी येथे लोकसेवक कुटे यांनी त्यांची दुचाकी थांबवली. त्यांचेपाठोपाठ मीही माझे ताब्यातील दुचाकी थांबवली. त्यावेळी लोकसेवक कुटे यांनी त्यांचे बॅगेतुन तक्रारदार यांचे करआकारणी कागदपत्रे बाहेर काढली, त्यावर तक्रारदार यांच्या सहया घेतल्या. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक कुटे यांना लाच रक्कम कमी करण्याबाबत विचारले असता त्यांनी आधी 10000/- कमी दया असे सांगितले, त्यानंतर पुन्हा एक लाख दया असे सांगितले. तक्रारदार शेलार यांनी त्यांचे पॅटच्या खिशातुन नोटांचे दोन बंडल काढुन लोकसेवक यांचेसमोर धरले. त्यावेळी लोकसेवक कुटे यांनी त्यांचेजवळील कागदपत्रे काढलेली काळ्या रंगाच्या सॅगची चैन उघडली व तक्रारदार यांचे समोर धरुन त्यामध्ये सदर लाच रक्कम टाकण्यास तक्रारदार यांना सांगितले. त्यावर तक्रारदार शेलार यांनी हे 1लाख 20हजार रुपये असुन मोजुन घ्या व त्यातील 20000/- रुपये परत दया असे सांगितले असता, लोकसेवक कुटे यांनी 120000/- रुपये ठेवलेल्या सॅगची चैन लावुन सदर सॅग ही स्वत:चे पाठीला अडकवली. त्यावेळी शेलार यांनी लाचरक्कम स्वीकारलेबाबतचा डोळ्यावरचा चष्मा काढुन सापळा पथकास इशारा केला, अशी हकीकत पंच 1 खेडकर यांनी आम्हाला सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार शेलार यांना घडलेल्या हकिकतीबाबत विचारले, त्यावेळी त्यांनीसुध्दा पंच 1 यांचेप्रमाणेच हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही लोकसेवक उमेश कुटे यांना घेवुन त्याचे करसंकलन कार्यालय, सांगवी येथे गेलो. तेथे लोकसेवक श्री. उमेश कुटे यांचेवर झालेल्या सापळा कारवाईबाबत त्यांच्या वरिष्ठ प्रभारी सहायक मंडल अधिकारी सीमा अनिल सुकाळे यांना समक्ष कळविले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी दिनांक 02/09/2026 रोजी तक्रारदार श्री. सुरेश विश्वनाथ शेलार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. 03/09/2026 रोजी 9:30 वा ते 14:00 वाचे दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाईदरम्यान लोकसेवक श्री. उमेश सुब्राव कुटे, वय 35 वर्षे, पद- लिपीक, वर्ग- 3, नेमणुक- कर संकलन विभाग सांगवी, पिंपरी- चिंचवड, रा- फ्लॅट न 1109, बी विंग, गट न 920,924,925,926,नेवाळे वस्ती, शुभकलस सोसायटी, चिखली असे सांगितले. मुळ पत्ता- मु रामेश्वर, ता भुम, जि धाराशिव यांनी तक्रारदार यांचे सर्वे क्र 10/2, मोरया पार्क, लेन न 6, पिंपळे गुरव, पिंपरी चिंचवड, पुणे येथे नव्याने बांधलेल्या घराची प्रतिवर्षी कर आकारणी जास्तीची दाखवुन ती कमी करण्यासाठी 1,50,000/- रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 1,20,000/- रुपयांची मागणी पंचासमक्ष करुन सदर रक्कम पंचांसमक्ष स्वीकारली. म्हणुन माझी लोकसेवक श्री. श्री. उमेश सुब्राव कुटे, वय 35 वर्षे, पद- लिपीक, वर्ग -3, नेमणुक- कर संकलन विभाग सांगवी, पिंपरी- चिंचवड, रा- फ्लॅट न 1109, बी विंग, गट न 920,924,925,926,नेवाळे वस्ती, शुभकलस सोसायटी, चिखली असे सांगितले. मुळ पत्ता- मु रामेश्वर, ता भुम, जि धाराशिव यांचेविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून, तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.
हा जबाब लिहुन दिला स.ता.म.

(शैलजा शिंदे)



Scanned with CamScanner

पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
JITENDRA VASANTRAO KOLI(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with CamScanner

ठाणे अंमलदार
पिंपरी चिंचवड

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** JITENDRA VASANTR/

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PI

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15.**Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**



Scanned with CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner